Exh. No. 11/13

Exh 6/13

मा.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर माजलगांव यांचे न्यायालयात.

वि.दि.दा.नं.12/2026

वादी :- स्मितेश सुरेशराव चिद्रवार

विरुध्द

प्रतिवादी :- सुरेश दिगांबरराव चिद्रवार व इतर

तडजोडपत्र

स.महोदय,

वादी व प्रतिवादी नं.1 ते 7 यांच्यामध्ये मा.न्यायालयाच्या बाहेर आपसात तडजोड झालेली असुन ते आपली तडजोड खालीलप्रमाणे मा.न्यायालयात दाखल करत आहे.

1. असे की, प्रतिवादी नं.1 हे वादीचे व प्रतिवादी नं.3, 6 आणि 7 चे पिता असुन प्रतिवादी नं.2 हया वादी व प्रतिवादी 3, 6 आणि 7 च्या आई आहेत. वादी व प्रतिवादी नं.3, 6 आणि 7 हे आपसात बहीण भाऊ आहेत. प्रतिवादी नं.4 वादीची पत्नी असुन प्रतिवादी नं.5 ही प्रतिवादी नं.3 ची पत्नी आहे.

2. असे की, वादी यांना वाटुन आलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

2/अ. माजलगांव नगर परिषद हद्दीतील सर्व्हे नं.379 मधील मिळकत नं.21-31/1/1 ज्याची लांबी पुर्वपश्चिम 60 फुट व रुंदी दक्षिणोत्तर 15 फुट असे असुन ज्याचे एकुण क्षेत्रफळ 900 चौ.फुट एवढे असुन सदर संपुर्ण पाच मजली आर.सी.सी. बांधकाम केलेली पुर्ण जागा आजरोजी वादी यांना वाटुन विभक्तपणे मालकी हक्काने ताब्यात देण्यात आलेली आहे. वादी सदर मिळकतीचा आजपासुन मालक व ताबेदार म्हणुन त्याचा आपल्या मर्जीनरुप उपभोग घेवु शकतात. सदर मिळकतीवर आजच्या तारखेपर्यंत जर काही कुठल्याही बँकेचा बोजा/कर्ज असल्यास त्याचा पुर्णपणे भरणा हे प्रतिवादी नं.1 व त्यांच्या पश्चात प्रतिवादी नं.3 हे आजपासुन 1

वर्षाच्या आत स्वतः करतील. सदर मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे आहेत.

पुर्वेस :- बीड रोड
पश्चिमेस :- खुर्पे यांची जागा
दक्षिणेस :- घुले यांची जागा
उत्तरेस :- दिलीप चिद्रवार यांची जागा

3. असे की, वादी यांना इतर मिळकतीतील हक्क सोडण्यासाठी प्रतिवादी नं.1 यांनी वादी यांना ठराविक रक्कम आजरोजी नगदीरोख दिलेले आहेत. सदर रक्कम वादी यांना प्राप्त झालेली असुन त्याचे भरणाबाबत कसलीही तक्रार राहिलेली नाही. तसेच वादी यांच्या हिस्याला येणारे सोने चांदी व त्याचे दागिने देखील प्रतिवादी नं. 1 व 2 यांनी आजरोजी वादी यांना दिलेले आहेत. सदर सोन्याच्या चांदीच्या चिज वस्तु वादी यांना मिळालेल्या आहेत. त्याच्या भरणाबाबत कसलीही तक्रार राहिली नाही.

4. असे की, प्रतिवादी नं.3 यांना खालील प्रमाणे मिळकत आजरोजी वाटुन विभक्तपणे व मालकी हक्काने ताब्यात देण्यात आलेली आहे.

4/अ. दाव्याच्या कलम नं.1 मधील नमुद केलेली मिळकत नं. अ, ब, क, ड आणि फ या मिळकती आजरोजी प्रतिवादी नं.3 यांना विभक्तपणे व मालकी हक्काने वाटुन ताब्यात देण्यात आलेल्या आहेत. सदर मिळकतींचा प्रतिवादी नं.3 हे त्यांच्या मर्जीनुरुप उपभोग घेवु शकतात.

5. असे की, तसेच प्रतिवादी नं.3 यांच्या हिस्याला येणारे सोने चांदी व त्याचे दागिने देखील प्रतिवादी नं. 1 व 2 यांनी आजरोजी प्रतिवादी नं.3 यांना दिलेले आहेत. सदर सोन्याच्या चांदीच्या चिज वस्तु प्रतिवादी नं.3 यांना मिळालेल्या आहेत. त्याच्या भरणाबाबत कसलीही तक्रार राहिली नाही.

6. असे की, सदर मिळकतीच्या, नगदी रक्कमेच्या आणि सोन्या चांदीच्या चीज वस्तुं व्यतिरिक्त जी काही मिळकत, नगदी रक्कम, गुंतवलेली रक्कम व खात्यावरील रक्कम इ. पुर्ण मिळकत, रक्कम

व सोन्या चांदीच्या चीज वस्तुंवर केवळ आणि केवळ प्रतिवादी नं.1 व 2 यांचाच हक्क व अधिकार राहिल. त्यांना म्हणजेच प्रतिवादी नं.1 व 2 यांना सदर चीज वस्तु, रोख रक्कम व गुंतवलेली रक्कत इ. बाबींचा कशा प्रकारे विनयोग, वापर व वितरण करावयाचे आहे, याचा सर्वस्वी अधिकार हा प्रतिवादी नं.1 व 2 यांचाच राहिल.

7. असे की, प्रतिवादी नं.1 व 2 यांच्या हयातीमध्ये वरील वस्तु व मिळकतींबाबत निर्णय घेण्यासाठी ते स्वतंत्र असतील. त्यांना त्यासाठी वादीसह इतर कुठल्याही प्रतिवादींची लेखी किंवा तोंडी संमती घेण्याची आवश्यकता राहणार नाही. प्रतिवादी नं.1 व 2 यांच्या पश्चात त्यांच्या नगदीरोख स्वरुपात, चालु व बचत खात्यावर असलेली रक्कम इ. जी काही रक्कम त्यांच्या पश्चात शिल्लक असेल, तसेच इतर सोन्या चांदीच्या चीज वस्तु व दाव्यातील नमुद केलेल्या व्यतिरिक्त स्थावर व जंगम मालमत्तेवर व रक्कमेवर कोणाचा अधिकार असले याबाबता प्रतिवादी नं.1 व 2 हे आपले रितसर मृत्युपत्र नोंदवुन ठेवतील. त्याप्रमाणे सदरील मिळकतींचे वितरण केले जाईल हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

8. असे की, वरील प्रमाणे मिळकती हया वादी व प्रतिवादी नं.3 यांना वाटुन विभक्तपणे ताब्यात देण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रतिवादी नं. 1 व 2 यांचा शेवटपर्यंत योग्य पध्दतीने सांभाळ, औषधोपचार, पुरविण्याची संपुर्ण जबाबदारी ही वादी व प्रतिवादी नं.3 यांची समसमान पध्दतीने राहिल. वादी व प्रतिवादी नं.3 यांनी त्यांचे प्रतिवादी नं.1 व 2 यांच्या प्रती असलेले माता पित्याचे कर्तव्य निट पणे पार पाडणे व त्यामध्ये कसल्याही प्रकारचा कसुर न करणे इ. बाबी देखील ठरलेल्या आहेत. या प्रमाणे आपले कर्तव्य पार पाडण्यामध्ये वादी व प्रतिवादी नं.3 हे कसल्याही प्रकारे कसुर करणार नाहीत.

9. असे की, दाव्यातील नमुद केलेल्या मिळकतीवरील आपला हक्क प्रतिवादी नं.1, 2 व 4 ते 7 यांनी वादी व प्रतिवादी नं.3 च्या हक्कांत स्वखुशीने व कोणाच्याही दबावास बळी न पडता सोडुन दिलेला आहे.

10. असे की, येणे प्रमाणे वादी व प्रतिवादी नं.1 ते 7 यांच्यामध्ये आपसात कायमस्वरुपी तडजोड झालेली असुन सदर तडजोडपत्रा आधारे प्रकरण निकाली काढुन डिक्री करणे न्याय व योगय आहे.

<u>तरी विनंती की,</u>

येणे प्रमाणे वादी व प्रतिवादी नं.1 ते 7, यांच्यामध्ये आपसात कायमस्वरुपी तडजोड झालेली असुन सदर तडजोडपत्रा आधारे प्रकरण निकाली काढुन डिक्री करण्यात यावे हि विनंती.

दिनांक : 14/03/2026

ठिकाण : माजलगांव

वादी

1. स्मितेश सुरेशराव चिद्रवार

मार्फत

ॲड.दिपक ल.देशमुख

प्रतिवादी

1.सुरेश दिगांबरराव चिद्रवार

सौ.रजनी सुरेशराव चिद्रवार

2.सौ.रजनी सुरेशराव चिद्रवार

3.सुरज सुरेशराव चिद्रवार

4.सौ.पायल स्मितेश चिद्रवार

5.सौ.प्रिया सुरज चिद्रवार

6.सौ.शितल प्रमोद मुर्कैवार

7.सौ.श्वेतांबरी प्रविण घाडगे

मार्फत

ॲड.पवन ए.पांचाळ,

माजलगांव

**RCS No.12/2026**
**Exh.11**

## VERIFICATION

The plaintiff and defendants are present before the panel of National Lok Adalat. They are identified by their Ld. Advocates. Both parties admitted their signatures on this compromise. They also admitted contents therein to be true and correct. Both the parties submitted that no any coercion or undue influence practiced upon them. The parties have amicably settled their dispute as per terms and conditions mentioned in this compromise. Hence, this compromise is read and recorded.

14/3/2026

( D. N. Chamle )
Panel Head of Lok Adalat
Majalgaon, Dist-Beed.

Date: 14/03/2026

14/3/2026

Member of Lok Adalat